पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २१९**

(सभावृत्तांत)

**दिनांक – २२/०४/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा गुरुवार दिनांक **२२/०४/२०२१** रोजी **दुपारी २.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा. सदस्य सभागृहात तसेच काही सन्मा.सदस्य ऑनलाईन द्वारे तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

**१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.संतोष बबन कांबळे
४. मा.भोईर सुरेश शिवाजी
५. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
६. मा.बनसोडे राजू विश्वनाथ

याशिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), हे अधिकारी उपस्थित होते.

-----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२०) कोरोना कोविड-१९ ने बाधित व घरगुती विलगीकरण केलेले जास्त जोखीम असलेले व कोविडने बाधित रूग्ण तसेच कोविडची लागण होऊन बरे झालेल्या रूग्णांना फोनकॉल द्वारे वैद्यकिय मदत देणेसाठी खाजगी तत्वावर कॉल सेंटर चालू करणेबाबत.

विषय क्र.२१) पवना धरण पाईपलाईन टाकणे अंदोलनाच्यावेळी गोळीबारात जखमी झालेल्या शेतकरी वारसांना/नातेवाईकांना महापालिका सेवेत घेणेबाबत. – मा.भिमाबाई फुगे, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२२) करोना प्रादुर्भावाच्या धरतीवर लॉकडाऊनच्या काळात आर्थिक दुर्बल घटकांच्या कुटुंबाच्या उदर निर्वाहासाठी तातडीची आर्थिक मदत करणेबाबत. – मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२३) करोना प्रादुर्भावाच्या धरतीवर आर्थिक दुर्बल घटकांना आर्थिक मदत करणेबाबत. – मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने व ओपीडीमध्ये कोविड टेस्ट करणेबाबत. - मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२५) विद्युत दाहिनी सुरू करणेबाबत. – मा.राजू बनसोडे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२६) दापोडी येथे सर्व सोई सुविधांसह अद्ययावत दवाखाना उभारणेबाबत. - मा.राजू बनसोडे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संत तुकाराम नगर विरंगुळा केंद्रामध्ये सोहम सार्वजनिक ग्रंथालय यांना दिलेल्या कामाचा करारनामा १० वर्षे मुदतीचा करणेबाबत. - मा.शत्रुघ्न काटे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकातील नविन कामे काढणेकरिता कामाच्या तरतूदीमधे वाढ/घट व वर्गीकरण करणेबाबत. - मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकातील नविन कामे काढणेकरिता कामाच्या तरतूदीमधे वाढ/घट व वर्गीकरण करणेबाबत. - मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकातील नविन कामे काढणेकरिता कामाच्या तरतूदीमधे वाढ/घट व वर्गीकरण करणेबाबत. - मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३१) स्मशानभूमि जवळ मंडप टाकणे, स्ट्रेचर पुरविणे व आवश्यकते नुसार अम्ब्युलन्स पुरविणेबाबत.– मा.शशिकांत कदम, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव.

-----------

**खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली.**

सूचक – मा.शशिकांत कदम          अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

नाशिक येथे महापालिका रूग्णालयातील प्राणवायुच्या गळतीने झालेल्या दुर्घटनेत मृत्यु पावलेल्या नागरिकांना श्रध्दांजली वाहुन सदरची सभा शुक्रवार दि.२३/०४/२०२१ रोजी दु.२.०० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

सभापती - सदरची सभा शुक्रवार दि.२३/०४/२०२१ रोजी दु.२.०० वा. पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे)**
सभापती**,** स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २१९**

(सभावृत्तांत)

(दि.२२/०४/२०२१ ची तहकूब सभा)

**दिनांक – २३/०४/२०२१** **वेळ – दु.२.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२२/०४/२०२१ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक २३/०४/२०२१ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा. सदस्य सभागृहात तसेच काही सन्मा.सदस्य ऑनलाईन द्वारे तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

**१. मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.फुगे भिमाबाई पोपट
७. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
८. मा.भोईर सुरेश शिवाजी
९. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०. मा.यादव मीनल विशाल
११. मा.भालेकर प्रविण महादेव
१२. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१३. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील – आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.राय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.खाबडे – प्र.सह शहर अभियंता, मा.बोदडे, मा.बहुरे – सहाय्यक आयुक्त, मा.पाटील – प्राचार्य औ.प्र.केंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता वायसीएमएच, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.देशमुख, मा,सेठिया, मा.वाघुंडे, मा.काळे, मा.टकले – कार्यकारी अभियंता, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

अ) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२१७ दि.०७/०४/२०२१ व १५/०४/२०२१ दु.२.१५ वा. चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२१८ दि.१५/०४/२०२१ दु.२.३० चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ९२५० विषय क्रमांक – ०१

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१अ/कावि/४५/२०२१, दि.१६/०४/२०२१

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२२.०२.२०२१ ते दि.२८.०२.२०२१ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/१अ/कावि/४५/२०२१, दि.१६/०४/२०२१ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२५१ विषय क्रमांक – ०२

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.उप आयुक्त (भांडार) यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/२११/२०२१, दि.३१/०३/२०२१

मा.उप आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा आरोग्य विभागाचे मागणीनुसार आवश्यक फॉगिंग मशिन खरेदी करणेकामी ई.नि.सु.क्र.41-2020-21 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील लघुत्तम पुरवठाधारक मे.ए.एस.इंजिनियर्स, पुणे यांचे एकुण 50 फॉगिंग मशिन खरेदीसाठी प्रती मशीन दर र.रु.41,600/- कमी करून दिलेले असुन कमी करून दिलेले दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.21,92,400/- पेक्षा 5.12% ने कमी आहेत. सदरचे दर स्विकृत करणेत आलेले असुन त्यानुसार एकुण 50 नग फॉगिंग मशिन खरेदी करणेकामी करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सदर फॉगिंग मशिनसाठी 01 वर्षाचे वॉरंटी कालावधीनंतर 03 वर्षाकरीता 03 टक्के वार्षिक दराने CMC चे येणा-या प्रत्यक्ष खर्चास व एकुण 50 नग फॉगिंग मशिन खरेदी करणेकामी एकुण र.रू.20,80,000/- (अक्षरी र.रू.वीस लाख ऐंशी हजार फक्त) इतका खर्च होणार असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२५२ विषय क्रमांक – ०३

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/५५९/२०२१, दि.०९/०४/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.44/4/2020-21 अन्वये प्रभाग क्र.९ नेहरुनगर खराळवाडी व इतर भागांमधील रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी मे.क्लीन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. नि.र.रू.4,08,71,561/- (अक्षरी र.रु.चार कोटी आठ लाख एक्काहत्तर हजार पाचशे एकसष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.4,07,97,811/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.4,07,97,811/- पेक्षा 30.06% कमी म्हणजेच र.रु.2,85,33,989/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.7,12,159/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.73,750/- = एकुण र.रु.2,93,19,898/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२५३ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/५६१/२०२१, दि.०९/०४/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.78/15/2020-21 अन्वये प्रभाग क्र.६ मधील धावडेवस्ती व परिसरातील नाल्यांची सुधारणा करणेकामी मे.अण्णा कन्स्ट्रक्शन नि.र.रू.55,84,712/- (अक्षरी र.रु.पंचावन्न लाख चौ-याऐंशी हजार सातशे बारा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.55,40,812/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.55,40,812/- पेक्षा 15.86% कमी म्हणजेच र.रु.46,62,039/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.71,546/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.43,900/- = एकुण र.रु.47,77,485/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२५४ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/५६२/२०२१, दि.०९/०४/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.69/14/2020-21 अन्वये प्रभाग क्र.८ सेक्टर क्र.४ मधील एल.सी.-१ गृहसंस्था शेजारील रस्त्यावर सी.डी. वर्क बांधणेकामी मे.तन्मय एंटरप्रायजेस नि.र.रू.59,96,528/- (अक्षरी र.रु.एकोणसाठ लाख शहान्नव हजार पाचशे अठ्ठावीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.57,16,578/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.57,16,578/- पेक्षा 18.09% कमी म्हणजेच र.रु.46,82,449/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.10,318/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,79,950/- = एकुण र.रु.49,72,717/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२५५ विषय क्रमांक – ०६

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/५६३/२०२१, दि.०९/०४/२०२१

विषय - प्रभाग क्र.३० दापोडी सुंदरबाग येथे अद्यावत पध्दतीने रस्ता विकसित करणेबाबत.

विषय क्र.६ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२५६ विषय क्रमांक – ०७

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ब-मुख्य/५६०/२०२१, दि.०९/०४/२०२१

विषय - प्रभाग क्र.३० कासारवाडी शास्त्रीनगर मधील विसावा हॉटेल पर्यंतचा रस्ता अद्ययावत पध्दतीने विकसित करणेबाबत.

विषय क्र.७ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२५७ विषय क्रमांक – ०८

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – सुरक्षा

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.नीता पाडाळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/३१२/२०२१, दि.०९/०४/२०२१

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात कोविड-१९ चा वाढता प्रभाव पहाता जम्बो कोविड केअर सेंटर व कार्यन्वित कोविड केअर सेंटरवर अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था करणेबाबत.

विषय क्र.८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२५८ विषय क्रमांक – ०९

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – ड क्षेत्रिय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.डक्षेका/३/कावि/९७/२०२१, दि.०७/०४/२०२१

मा.सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र ‘अ’ मधील (1 ते 1) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२५९ विषय क्रमांक – १०

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – ड क्षेत्रिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.डक्षेका/३/कावि/९८/२०२१, दि.०७/०४/२०२१

मा.सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र ‘अ’ मधील (1 ते 2) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२६० विषय क्रमांक – ११

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.सुनिता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

विषय - मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.३१ दि.०८/०४/२०२१

विषय क्र.११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२६१ विषय क्रमांक – १२

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.सुनिता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.३२ दि.०८/०४/२०२१

विषय क्र.१२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२६२ विषय क्रमांक – १३

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.सुनिता खुळे यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.३३ दि.०८/०४/२०२१

विषय क्र.१३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२६३ विषय क्रमांक – १४

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/५६४/२०२१, दि.१२/०४/२०२१

विषय - प्रभाग क्र.३० दापोडी मधील शितळादेवी चौक स.नं.६ ते मुस्लीम दफनभूमी स.नं.१५ पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणेबाबत.

विषय क्र.१४ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२६४ विषय क्रमांक – १५

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/३२६/२०२१, दि.१४/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जुलै-२०२० मध्ये कोरोना प्रादुर्भाव वाढला असता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे (PMRDA) यांचे कडून कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथे ८०० बेडचे जंबो कोविड रुग्णालय चालु करण्यात आले होते. तिथे कामकाज करणेकामी EOI प्रसिध्द करण्यात येऊन सर्व कामकाजाकरीता विविध एजन्सीजच्या नियुक्त्या करणेत आल्या होत्या. मा.आयुक्त,

मा.महापौर, मा.अति.आयुक्त क्र.१ तसेच इतर पदाधिकारी आणि अधिकारी यांचे समवेत दिनांक २२/०३/२०२१ रोजी मिटींग आयोजीत केली असता झालेल्या चर्चे प्रमाणे मा.आयुक्त यांनी अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय सध्या ६०० बेडसाठी दोन महिने कालावधीसाठी चालु करणेकामी आदेश दिलेले आहेत. सदर सभेचा सभावृत्तांत बनविणेत आलेला आहे. तसेच कोविडसाठी कार्यकारणी समिती गठीत करण्यात आलेली आहे त्या समितीच्या दिनांक २३/०३/२०२१ रोजी झालेल्या मिटींग मधील निर्णया प्रमाणे अण्णासाहेब मगर येथे जंबो कोविड रुग्णालय चालु करणेबाबत निर्णय घेणेत आला. कोविडच्या दुस-या टप्प्यामध्ये पूर्वी च्या (PMRDA कडून देणेत आलेल्या) कामकाजास अधीन राहुन मे.मेडब्रोज हेल्थकेअर आणि मे.जेस आयडीया प्रा.ली, मे.चित्रा सेल्स अँन्ड सर्व्हीसेस यांना कामकाज आदेश देणेत आलेले आहेत. तसेच मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडून सूचना प्राप्त झाल्याप्रमाणे आपत्कालीन बाब म्हणून मान्यता देणे आवश्यक आहे. M/s.Cell Beans Healthcare Informatics Pvt.Ltd. यांना Jess Ideas Pvt. Ltd. यांचेकडुन २१/०८/२०२० रोजी HIS, EMR, Telemedicine & PACS Platform Application License and Implementation Service कामी कामाचे आदेश देण्यात आले होते. M/s.Jess Ideas यांचेशी केलेल्या चर्चेनुसार PMRDA ने याकामकाजा करीता स्वतंत्र EOI प्रसीध्द केलेला नव्हता. M/s.Jess Ideas यांचेमार्फत सदर कामकाजाचे आदेश देणेकामी कळविणेत आले होते. त्याप्रमाणे त्यांच्याकडून एकूण र.रु.१५ लाखाचे आदेश देण्यात आले होते. M/s. Jess Ideas यांनी ते सदर काम करण्यास तयार नसुन M/s.Cell Beans Healthcare Informatics Pvt.Ltd. यांना थेट पध्दतीने काम देण्यास हरकत नसल्याचे पत्रान्वये कळविले आहे. त्या प्रमाणे M/s.CellBeans Healthcare Informatics Pvt.Ltd. यांनी दि.२५/०३/२०२१ रोजी दिलेल्या दरा प्रमाणे एक महिन्यासाठी र.रु.३ लाख अधिक १८% कर असा एकूण दोन महीन्यासाठी र.रु.७,०८,०००/- (सर्व करांसहीत) एवढा खर्च येणार असल्याचे कळविले होते. मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे अभिप्रायानुसार M/s.Cell Beans Healthcare Informatics Pvt.Ltd. यांचेशी केलेल्या चर्चे प्रमाणे र.रु.५०,०००/- प्रति महा कमी करुन दिले आहेत. दिनांक ०५/०४/२०२१ रोजी र.रु.५,००,०००/- अधिक १८% कर या प्रमाणे एकूण र.रु.५,९०,०००/- या दरानुसार दोन महीन्यासाठी कामकाज करणेसाठी तयार असले बाबत कळविले आहे. वरील दरा प्रमाणे दोन महिन्यासाठी काम करणेकामी एकूण र.रु.५,९०,०००/- (अक्षरी र.रू.पाच लाख नव्वद हजार फक्त) (सर्व करांसहीत) त्यांना कामकाज आदेश देणेत आलेले असल्याने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ९२६५ | विषय क्रमांक – १६ |
| दिनांक – २३/०४/२०२१ | विभाग – वैद्यकिय मुख्यालय |
| सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.शशिकांत कदम |

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/३२७/२०२१, दि.१४/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये सध्या कोरोना (कोविड-१९) रुग्ण झपाट्याने वाढत चालले आहेत. फेब्रुवारी २०२१ च्या दुस-या आठवड्या पासुन कोरोना बाधीतांची संख्या

दिवसें दिवस वाढु लागलेली आहे. रुग्णसंख्या झपाट्याने वाढत असल्याने मनाप मार्फत चालु करणेत आलेली घरकुल येथील डी-५, ६, ७, ८, १०, १२ हे कोविड सेंटर दोन महीन्याकरीता तातडीने चालु करणेत आलेले आहेत. वाढती रुग्णसंख्या विचारात घेऊन पुढील कोविड सेंटर चालु करणेकामी सुचना दिलेल्या आहेत. मे.ट्रस्ट हेल्थ केअर यांना पत्र क्र.मसाभां/४/ कावि/३२०/२०२१ दि.१२/०४/२०२१ अन्वये पत्र देऊन जुन्या दराने काम करण्यास तयार आहात किंवा कसे या बाबत विचारणा करण्यात आले असता त्यांचे कडील दि.१२/०४/२०२१ चे पत्रान्वये जुन्या दराने काम करण्यास तयार असले बाबत कळविले आहे. भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असेलेने मे.ट्रस्ट हेल्थ केअर यांना सामाजिक न्याय विभाग, मुलांचे वसतीगृह, मोशी येथील कोविड सेंटर दि.१७/०४/२०२१ ते १६/०६/२०२१ पर्यंत (६१ दिवस) दोन महीने र.रु.५४३/- प्रती दिन प्रती बेड या प्रमाणे २०० बेड पर्यंत कोविड केअर सेंटर चालविणेस देणेबाबत र.रु.६६,२४,६००/- चे कामकाज आदेश EOI क्र.०३/२०२०-२१ मधील अटी शर्ती आणि करारनाम्यास अधीन राहून पूर्वीच्या मंजूर दराने देणेत आलेले असल्याने कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२६६ विषय क्रमांक – १७
दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/१५/२०२१, दि.१५/०४/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडील सोबतचे प्रपत्र “अ” (1 ते 10) मधील विकास कामांचे अवलोकन होऊन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरिअलच्या निर्धारित केलेल्या दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२६७ विषय क्रमांक – १८
दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.मभां/४/कावि/२३४/२०२१, दि.१५/०४/२०२१

विषय - मनपा आरोग्य विभागाचे मागणीनुसार आवश्यक पायरेथ्रम एक्स 2 टक्के आय एस आय मार्क खरेदी करणेबाबत.

विषय क्र.१८ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२६८ विषय क्रमांक – १९

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – स्थापत्य उद्यान

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/उद्यान/२९४/२०२१, दि.१२/०४/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.60/06/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१२ तळवडे, आ.क्र.१/५२ व १/५३ ला सीमाभिंत बांधणेकामी बी.डी.यादव नि.र.रू.1,60,44,799/- (अक्षरी र.रु.एक कोटी साठ लाख चव्वेचाळीस हजार सातशे नव्याण्णव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,57,77,599/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,57,77,599/- पेक्षा 23.73% कमी म्हणजेच र.रु.1,20,33,575/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,88,252/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,67,200/- = एकुण र.रु.1,24,89,027/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ९२६९ विषय क्रमांक – २०

दिनांक – २३/०४/२०२१ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मातंवि/११/कावि/११७/२०२१, दि.१९/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सद्यस्थितीत कोरोना कोविड–१९ चे रुग्ण संख्येत लक्षणीय वाढ होत असुन विविध रुग्णालयातील व्यवस्था अपुरी पडत असल्याने कोरोनाचा प्रादुर्भाव झालेल्या परंतु त्याबाबत कोणतीही लक्षणे नसलेल्या रुग्णांचे घरगुती विलगीकरण करुन त्यांचेवर उपचार चालु आहेत. आज दिनांक १३ एप्रिल २०२१ अखेर २१,००० सकारात्मक रुग्णांचे घरगुती विलगीकरण करुन त्यांचेवर उपचार चालु आहेत. तसेच सद्यस्थितील कोविड १९ या संसर्गजन्य रोगाच्या रुग्णवाढीचा वेग पाहता घरगुती विलगीकरण करण्यात येणा-या रुग्णांची लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. घरगुती विलगीकरण केलेल्या रुग्णांना प्रस्तावात नमुद प्रश्नावली द्वारे वैद्यकीय मदत देणेकामी संबधीत रुग्णांना त्यांचे अलगीकरणाचे १४ दिवसांचे कालावधीमध्ये रोजचे रोज दिवसातुन एक वेळा दुरध्वनी करुन रुग्णाची माहीती घेणे व त्यास आवश्यक वैद्यकीय मदत पुरविणे व सदर माहिती डॅशबोर्डवर उपलब्ध करणे व सदरची माहिती आवश्यकता भासल्यास

संबधीत कोविड केअर सेंटर व रुग्णालयांना देणे व त्यानुसार रुग्णांवर उपचार करणे शक्य आहे. तसेच घरगुती विलगीकरण केलेल्या रुग्णांना काही अत्यावश्यक मदतीची गरज भासलेस कॉल ऑपरेटर यांचे मार्फत रुग्णांना अवश्यक असलेली मदत कशाप्रकारे उपलब्ध होईल या बाबत मार्गदर्शन करणे शक्य आहे. याकामी मा.आयुक्त सो यांनी दिनांक १३ एप्रिल २०२१ रोजीचे बैठकीत दिलेल्या सुचने प्रामाणे भारतीय साथरोग अधिनयम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपलिका अधिनियम कलम ६३(३) व कलम ६७(३) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव व प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी कामकाजाची निकड व तातडीची बाब विचारात घेता सदरचे कामकाज थेट पद्धतीने मे.ऑरनेट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. यांचे मार्फत करारनमा करुन करता येणे शक्य आहे. उक्त बैठकीत मे.ऑरनेट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. यांचे प्रतिनीधी व उपस्थित अधिकारी यांनी मान्य केलेप्रमाणे प्रती कॉलचा दर र.रु.१३/- सर्व करांसह असा राहील. सदरचे कामाकाज दिनांक १४ एप्रिल २०२१ पासुन प्रथमत: तीन महिने कालावधी अथवा कोविड १९ चा प्रादुर्भाव कमी होईल अशा कालावधीसाठी करता येणे शक्य आहे. सद्यस्थितीत महापालिकाक्षेत्रात सरासरी प्रती महा २०००० घरगुती पद्धतीने विलगीकरण केलेल्या रुग्णांची संख्या असुन त्यांना दररोज दुरध्वनीद्वारे वैद्यकीय मदत देणे कामी खालील प्रमाणे खर्च आपेक्षीत आहे.

| | |
|---|---|
| सरासरी रुग्ण संख्या | २०,००० |
| X प्रती दुरध्वनी रक्कम रुपये | १३/- |
| एकुण रक्कम रुपये | २,६०,०००/ |
| X तिन महिने रक्कम रुपये | २,३४,००,०००/- |

उपरोक्त नमुद केलेनुसार सदर कामाकाज तीन महिने कालावधीसाठी करणे करीता र.रु.२,३४,००,०००/- (अक्षरी र.रू,दोन कोटी चौतीस लाख फक्त) अधिक कर इतका खर्च अपेक्षित असुन सदर खर्च भाडांर विभागाकडील “करोना निधी” या लेखाशिर्षामधुन करता येणे शक्य आहे. सबब, मे.ऑरनेट टेक्नॉलॉजीज प्रा. लि यांचे मार्फत सदर कामकाज तिन महिने कालावधी अथवा कोविड १९ चा प्रादुर्भाव कमी होईल अशा कालावधीकरता करणे तसेच त्यांचेसोबत करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्च भांडार विभागाकडील करोना निधी या लेखा मधुन खर्ची टाकणेस कोर्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२७० विषय क्रमांक – २१

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.भिमाबाई फुगे, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव –

पवना धरण पाईप लाईन टाकणे अंदोलना च्या वेळी गोळीबारात खालील शेतकरी जखमी झालेले आहेत.

| अ.क्र. | जखमी शेतक-याचे नावे | गाव |
|---|---|---|
| १ | श्री. योगेश शंकर तुपे | गेव्हडे वसाहत |
| २ | श्री. शिवाजी भैरु वर्वे | तिकोना पेठ |
| ३ | श्री. अमित लक्ष्मण दळवी | कोथूर्ने |
| ४ | श्री. विशाल राहिदास राऊत | करुंज |
| ५ | श्री. अजित जालिदंर चौधरी (वारस) गणेश मच्छिद्र चौधरी | सडवली |
| ६ | श्री. नवनाथ मधुकर गराडे | बऊरवाडी , बऊर |
| ७ | श्री. गणेश ज्ञानेश्वर तरस | थुगाव |
| ८ | श्री. तुकाराम बबन दळवी | बऊरवाडी , बऊर |
| ९ | श्री. मारुती बारकू खिरीड ( वारस) अनिकेत मारुती खिरीड | बऊर |
| १० | श्री. काळूराम सखाराम राऊत ( वारस ) गोरक्षनाथ वरघडे | राऊतवाडी |
| ११ | श्री. दत्तात्रये गबळू पवार ( वारस ) गणपत दत्तात्रये पवार | राऊतवाडी |
| १२ | श्रीम. सुरेखा शिवाजी कुडे | सडवली |

वरील जखमी शेतक-यांच्या वारसांना/ नातेवाईक महापालिका सेवेत घेणेस मान्यता देणेकामी महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२७१ विषय क्रमांक – २२

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव –

कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी राज्यात कडक लॉकडाऊन लागू करण्यात आला आहे. सद्य परिस्थितीत सर्वत्र कोरोनाने थैमान घातले असून राज्यात संसर्ग दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत कोरोना संसर्ग टाळण्यासाठी राज्यात कडक लॉकडाऊनचा निर्बंध करण्यात आल्याने हातावर पोट असणा-या आर्थिक दुर्बल घटकातील रिक्षाचालक, परवानाधारक फेरीवाले , नोंदणीकृत घरेलू कामगार, चर्मकार (गटई कामगार), नाभिक, शालेय विद्यार्थी वाहतूक करणारे व्हॅनचालक व बसचालक, जीम ट्रेनर, वाजंत्री व बॅन्ड पथकातील प्रत्येकी ६ माणसे, कलावंत यामधील असंख्य कुटूंबावर आर्थिक संकट ओढवले असून त्यांच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आली आहे. याबाबत मा. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी पत्र दिले आहे. तरी पारंपारिक व्यवसाय करून उदरनिर्वाह चालविणा-या लोकांचे संपुर्ण व्यवसाय उध्वस्त झाले आहेत. अशा अडचणीच्या काळात शहरातील लोकसंख्येची व्याप्ती विचारात घेता व महापालिकेच्या तिजोरीवर

आर्थिक ताण पडू नये म्हणून वरील नोंदणीकृत घटकांना प्रती व्यावसायिक र.रू.३०००/- (अक्षरी र.रू.तीन हजार फक्त) ची आर्थिक मदत देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२७२ विषय क्रमांक – २३

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा. शशिकांत कदम अनुमोदक – मा. शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव –

कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाने अनेक दूरगामी परिणाम अर्थव्यवस्थेवर झालेला असून अनेक छोटे व्यावसायिक आणि मोलमजुरी करणारे कष्टकरी या घटकाला आर्थिक तणावाचा सामना करावा लागत आहे. यामध्ये परवानाधारक रिक्षाचालक, पथविक्रेते, घरेलू कामगार, बांधकाम मजूर, चर्मकार, नाभिक, शालेय विद्यार्थी वाहतूक करणारे वाहन चालक, जिमट्रेनर, लोककलावंत आणि बँड पथक या घटकांच्या उपजीविकेवर विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे या घटकांना महानगरपालिके मार्फत आर्थिक मदत देणे आवश्यक असल्याने खालील प्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करणा-या अर्जदार व्यक्तींना पालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत र.रु. ३०००-/ ( एकदाच ) अर्थसहाय्य अदा करण्यास मान्यता देण्यात यावी.

**1) परवानाधारक रिक्षाचालक - अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आधारकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

क)पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक मतदार ओळखपत्राची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ड) आरटीओकडून मिळालेल्या बॅच बिल्ला आणि लायसन ची झेरॉक्स सत्यप्रत

इ) वाहन नोंदणी प्रमाणपत्राची (आर.सी.) आणि रिक्षा परमिटची झेरॉक्स सत्यप्रत

**2) पथविक्रेते - अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आधारकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

क)पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक मतदार ओळखपत्राची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ड) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून मिळालेल्या परवान्याची झेरॉक्स सत्यप्रत

इ) पंतप्रधान आत्मनिर्भर योजनेअंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने दिलेल्या शिफारस पत्राची झेरॉक्स सत्यप्रत

**3) चर्मकार व्यवसायिक - अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आधारकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

क)पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक मतदार ओळखपत्राची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ड) दुकान परवान्याची झेरॉक्स सत्यप्रत (शॉप ऍक्ट परवाना प्रत)

इ) गटई कामगारांचे शासकीय / मनपाकडील नोंदणी प्रमाणपत्र (असल्यास)

**4) नाभिक व्यावसायिक - अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आधारकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

क)पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक मतदार ओळखपत्राची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ड) दुकान परवान्याची झेरॉक्स सत्यप्रत (शॉप ऍक्ट परवाना प्रत)

इ) एका दुकानासाठी जास्तीत जास्त ५ कामगारांना अर्थसहाय्य देय राहील.
प्रत्येकाची वर नमुद केलेप्रमाणे अ, ब, क ही कागदपत्रे आवश्यक

**5) शालेय विद्यार्थी वाहतूक करणारे वाहन चालक (शाळेच्या पे रोलवरील वगळून) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आधारकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

क)पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक मतदार ओळखपत्राची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ड) आरटीओ कडून मिळालेल्या परवान्याची आणि लायसन ची झेरॉक्स सत्यप्रत

इ) शाळेचे मान्यता पत्राची सत्यप्रत

**6) जिम व्यवसायिक - अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आधारकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

क)पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक मतदार ओळखपत्राची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ड) शॉप ऍक्ट लायसन्सची झेरॉक्स सत्यप्रत

इ) एका जिमसाठी जास्तीत जास्त ५ जिम ट्रेनर यांना अर्थसहाय्य देय राहील.
प्रत्येकाची वर नमुद केलेप्रमाणे अ, ब, क ही कागदपत्रे आवश्यक

फ) जिम ट्रेनरने किमान ६ महिने कालावधीचा जिम ट्रेनर कोर्स पुर्ण केला असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक

**7) लोककलावंत - अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आधारकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

क)पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक मतदार ओळखपत्राची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ड)लोककलावंत असले बाबतची शासकीय नोंदणी प्रमाणपत्राची झेरॉक्स सत्यप्रत किंवा नोंदणीकृत नाटयकला सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित, अधिकृत संस्थेशी निगडीत कलावंत सभासद असलेबाबतचा पुरावा आवश्यक

**8) घरेलू कामगार - अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आधारकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

क)पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक मतदार ओळखपत्राची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ड) घरेलू कामगार शासकिय नोंदणी प्रमाणपत्राची झेरॉक्स सत्यप्रत (कामगार आयुक्त यांचेकडील नोंदणी / नोंदणी शुल्क भरल्याची पावती)

**9) बांधकाम मजुर - अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आधारकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

क)पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक मतदार ओळखपत्राची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ड) बांधकाम मजुर शासकीय नोंदणी प्रमाणपत्राची झेरॉक्स सत्यप्रत (कामगार आयुक्त यांचेकडील नोंदणी / नोंदणी शुल्क भरल्याची पावती)

**10) बँड पथक - अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

अ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आधारकार्डची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

क)पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक मतदार ओळखपत्राची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक

ड) दुकान परवान्याची झेरॉक्स सत्यप्रत (शॉप ऍक्ट परवाना प्रत)

इ) एका बँड पथकासाठी जास्तीत जास्त ५ वाजंत्री कलाकारांना अर्थसहाय्य देय राहील. प्रत्येकाची वर नमुद केलेप्रमाणे अ, ब, क ही कागदपत्रे आवश्यक

यासाठी आवश्यक असणारी तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील सन २०२१-२२ (अंदाज पत्रक पान क्र.३१३) या लेखाशिर्षावरील अनु क्र ३, ४, ६, ८, १०, ११, १२ या प्रत्येक लेखाशिर्षावरील र.रु.५,००,०००/- वगळून उर्वरीत सर्व रक्कम व अ.क्र.७ वरील र.रु.८०,००,०००/- अनु क्र.९ वरील र.रु.६,००,००,०००/ अ.क्र.१३ वरील र.रु.१,७०,००,०००/ व अनु क्र १४ वरील र.रु.८०,००,०००/ असे एकूण र.रु.१४,६५,०००००/ (अक्षरी र.रु.चौदा कोटी पासष्ट लाख फक्त) योजनेसाठी खर्च करणेस तसेच नागरवस्ती विकास योजना विभागाच्या इतर कल्याणकारी योजनेअंतर्गत कोविड दिलासा हे नवीन उपलेखाशिर्ष करणेस व त्यात सदरची रक्कम वर्ग करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच सदरची वापरलेली रक्कम नागरवस्ती विकास योजना विभागाकडील संबंधित योजनांसाठी आवश्यक असल्याने पुढील चार महिन्यात लेखा विभागाने उपलब्ध करून द्यावी तसेच सदर योजनेतील अखर्चित राहिलेली रक्कम नागरवस्ती विकास योजना विभागास संबंधित योजनांवर खर्च करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२७३ विषय क्रमांक – २४

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव –

महानगरपालिकेच्या सर्व रूग्णालये व ओपीडीमध्ये कोविड टेस्ट (अँटिजेन रॅपिड टेस्ट) करणेकामी टोकन देणे व तेथेच कोविड टेस्ट करण्यात यावी व त्यासाठी आवश्यक ते वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२७४ विषय क्रमांक – २५

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.राजू बनसोडे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.राजू बनसोडे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३० दापोडी येथे वाढती लोकसंख्या पाहता दापोडी स्मशानभूमीच विद्युत दाहिनीची अत्यंत आवष्यकता असून त्याठिकाणी नव्याने विद्युत दाहिनी सुरू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२७५ विषय क्रमांक – २६

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.राजू बनसोडे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.राजू बनसोडे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –

दापोडी गावाची झपाट्याने वाढती लोकसंख्या पहाता त्या ठिकाणी अद्यावत स्वरूपाच्या व सर्व सुविधा उपलब्ध असलेल्या दवाखान्याची अत्यंत गरज आहे. सध्याची लोकसंख्या पहाता दापोडी गावातील सरकारी दवाखान्यात साथीच्या आजारा सोबत प्रसुती व इतर आजारावर उपचार घेणा-या रूग्णांची संख्या जास्त आहे तसेच खाजगी रूग्णालयात गोरगरीब नागरिकांना तातडीची सेवा गोरगरिब जनतेला न परवडणारी असून महानगरपालिकेच्या रूग्णालयात जाहा अपुरी पडत असल्याने नागरिकांना नाहक त्रास सगन कारान लागतो त्याची दखल घेत दापोडी येथील अनु.क्र.३/२९ सर्वे नंबर ८५ अ या ठिकाणी प्रसुती गृह व अत्यावश्यक सोयींसह दवाखान्याची आवश्यकता आहे. त्यासाठी २० गुंठे जागा आपक्षित आहे. त्याठिकाणी प्रशस्त रूग्णालय बांधून नागरिकांची होणारी गैरसोय टाळावी तरी त्या ठिकाणी रूग्णालय बांधण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२७६ विषय क्रमांक – २७

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.शत्रुघ्न काटे, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

"सोहम सार्वजनिक ग्रंथालय" ही संस्था गेली ३० वर्षापासून पिंपरी चिंचवड भागात आपली सेवा देत आहे. या ग्रंथालयाचे कार्य शहरात उल्लेखनीय आहे. या ग्रंथालयात २०००० विविध विषयांची ग्रंथ संपदा असुन ती वाचकांना विनामुल्य वाचनासाठी दिली जातात. या ग्रंथालयाची स्वतंत्र अभ्यासिका असुन या अभ्यासिकेच्या माध्यमातून १५ अधिकारी प्रशासकिय सेवेत गेले आहेत. अभ्यासिकेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांकडुन सदर ग्रंथालय कोणत्याही प्रकारचे शुल्क घेत नाही. या ग्रंथालयाचे कार्य पिंपरी चिंचवड शहरात उल्लेखनीय व प्रशंसनीय आहे. "सोहम सार्वजनिक ग्रंथालय" या संस्थेस संत तुकाराम नगर येथील स्वर्गीय मंगलसेन बहल विरंगुळा केंद्रातील १५X१५ च्या दोन खोल्यांची जागा मागील ५ वर्षेपासुन करारनामा

करून दिलेली आहे. तथापि या ग्रंथालयास वार्षिक उत्पन्न नाही. या ग्रंथालयाची वाचनसेवा त्यांची शहरातील मागील सेवा विचारात घेवून संत तुकारामनगर येथील स्वर्गीय मंगलसेन बहल विरंगुळा केंद्रातील १५X१५ च्या दोन खोल्यांची जागा मागील १० वर्षांसाठी "सोहम सार्वजनिक ग्रंथालय" यांना नाममात्र दरात करारनामा करून दिल्यास ते ग्रंथालयाचे योग्य ते नियोजन करून व्यवस्थित चालवतील. तरी त्यांना सदर जागा करारनामा करून देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२७७ विषय क्रमांक – २८

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकातील विकास कामांसाठी अपुरी तरतूद ठेवणेत आली असल्याने त्यामधील काही विकास कांमाचे अंदाजपत्रक तयार करून निविदा कार्यवाही करणेसाठी प्रथम प्राधान्याने करावयाचे कामाचे तरतूदीमध्ये वाढ करणे अत्यवश्यक आहे त्यासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट व वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२,३०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२७८ विषय क्रमांक – २९

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकातील विकास कामांसाठी अपुरी तरतूद ठेवणेत आली असल्याने त्यामधील काही विकास कांमाचे अंदाजपत्रक तयार करून निविदा कार्यवाही करणेसाठी प्रथम प्राधान्याने करावयाचे कामाचे तरतूदीमध्ये वाढ करणे अत्यवश्यक आहे त्यासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट व वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.३४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२७९ विषय क्रमांक – ३०

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकातील प्रभागस्तरीय विकास कामांसाठी अपुरी तरतूद ठेवणेत आली असल्याने त्यामधील काही विकास कांमाचे अंदाजपत्रक तयार करून निविदा कार्यवाही करणेसाठी प्रथम प्राधान्याने करावयाचे कामाचे

तरतूदीमध्ये वाढ करणे अत्यवश्यक आहे त्यासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट व वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.९०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२८० विषय क्रमांक – ३१

दिनांक – २३/०४/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.राजू बनसोडे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव –

सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्मशानभूमी/ विद्यूत दाहिनी मध्ये मृतदेहाचे अंत्यसंस्कार करणेकामी वाढत्या मृत्यूमुळे विलंब लागत आहे. काही स्मशानभूमीच्या बाहेर अँम्ब्यूलन्सच्या लाईन दिसून येतात व मृतदेहाचा अंत्यसंस्कार होईपर्यंत सदरच्या रूग्णवाहिका तेथेच थांबून राहतात. यामुळे रूग्णवाहिका अन्य रूग्णांसाठी उपलब्ध होत नाही. तरी स्मशानभूमीमध्ये मृतदेह ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार स्ट्रेचर उपलब्ध करण्यास व त्याठिकाणी मंडपाची व्यवस्था करण्यास तसेच रूग्णवाहिकांसाठी व शववाहिकांसाठी एकच हेल्पलाईन नंबर करण्यास व यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे)**
सभापती**,** स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/८०५/२०२१
दिनांक - २६/०४/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

(क्र.डक्षेका/३/कावि/९७/२०२१ दि.७/४/२०२१ विषय क्र.९ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी -17
(विषयपत्र क्र.डक्षेका/नि-3/कावि/97/2021 दि. 07/04/2021 लगत)
प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. शुभम उदयोग | स्थापत्य/ड प्रभाग/Prabhag/3/9-2020-21 | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख परिसरात आरोग्य विषयक कामकाजाकरीता व इतर स्थापत्य विषयक कामाकरीता ट्रक, क्रेन, जे.सी.बी., डंपर, ट्रॅक्टर, इत्यादी मशिनरी पुरविणे. (सन २०२०-२१ करीता) | 09/11/2020 | डक्षेका/03/कावि/96/2021 | 07/04/2021 | 599225 | 599225 | 0 | 0 | 27.11 | % कमी | 436775 |
| | | | | | | | | एकुण | | | | | 436775 |

स. सहा. आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी पुणे 17
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(क्र.डक्षेका/३/कावि/९८/२०२१ दि.७/४/२०२१ विषय क्र.१० चे लगत)

(१२)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी -17
(विषयपत्र क्र.डक्षेका/नि-3/कावि/98/2021 दि. 07/04/2021 लगत)
प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. शुभम उदयोग | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/9-2020-21 | ड प्रभाग अंतर्गत वाकड उपविभागांतर्गत परिसरातील स्ट्रीटलाईटची देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे. 2020/21 | 04/12/2020 | डक्षेका/03/कावि/94/2021 | **06/04/2021** | 892759 | -30.06 | % कमी | 624396 |
| 2 | मे. शुभम उदयोग | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/10-2020-21 | ड प्रभाग अंतर्गत वाकड उपविभागातील फिडर पीलर व जंक्शन बॉक्सची आवश्यक देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे. 2020/21 | 04/12/2020 | डक्षेका/03/कावि/95/2021 | **06/04/2021** | 892631 | -30.06 | % कमी | 624306 |
| | | | | | | | | एकुण | | 1248702 |

सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी पुणे 17
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## (क्र.पापु/८/कावि/११५/२०२१ दि.१५/४/२०२१ विषय क्र.१५ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पाणीपुरवठा विभाग पिंपरी-१८
क्र.पापु/कावि/०८/१५/२०२१
दि. १५-०४-२०२१

प्रपत्र अ ( १ ते १० )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | १३ |
| १ | मे.सागर कन्स्ट्रक्शन | 7/24/2020-21 | पुणे नाशिक महामार्गाच्या पूर्व बाजूस असणाऱ्या परिसरात पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्ती करणे (सन २०२०-२१) | 08-02-2021 | पापु /८/कावि/१००६/२०२१ | 08-02-2021 | 16,65,269 | 16,65,269 | 866 | 0 | 35.37 | % कमी | 10,77,129 |
| २ | मे.एल.के.एस .सर्व्हेयर्स | 7/18/2018-19 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत गळती काढणे ,दुषित पाणी तक्रार निवारण ई .करिता करण्यात आलेले ट्रेनचेस ,पेव्हिंग ब्लॉक्स ,बी.बी.एम .पद्धतीने करणे . | 22-02-2021 | पापु /८/कावि/९९२/२०२१ | 25-03-2021 | 20,99,999 | 20,99,999 | 1,810 | ० | 25.10 | % कमी | 15,74,709 |
| ३ | मे.युनिक ट्रेडर्स | 12/38/2020-21 | प्रभाग क्र १३ मधील यमुनानगर व से.क्र.२२ ओटा स्कीम येथे आवश्यक तेथे जलवाहिनी टाकणे व इतर अनुषंगिक कामे करणे . | 02-03-2021 | पापु /८/कावि/९९४/२०२१ | 09-04-2021. | 21,46,722 | 21,46,722 | 0 | ० | 16.96 | % कमी | 17,82,638 |
| ४ | मे.के.के.इंटरप्राय्जेस | 7/27/2020-21 | अजमेरा वास्तू उद्योग व मासुळकर कॉलोनी परिसरामध्ये पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे .(सन २०२०-२१) | 08-02-2021 | पापु /८/कावि/१००२/२०२१ | 30-03-2021 | 19,99,036 | 19,99,036 | 866 | 0 | 36.36 | % कमी | 12,73,053 |
| ५ | मे.शुभम उद्योग | 7/17/2020-21 | सन २०२०-२१ करिता विशाल टाकी ,पिंपरी स्टेशन एम्पायर इस्टेट इ.परिसरात पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती करणे . | 08-02-2021 | पापु /८/कावि/१००८/२०२१ | 30-03-2021 | 20,83,106 | 20,83,106 | 527 | ० | 36.09 | % कमी | 13,31,840 |
| ६ | मे.शुभम उद्योग | 7/18/2020-21 | सन २०२०-२१ करिता देखभाल दुरुस्ती अंतर्गत नेहरूनगर ,यशवंतनगर ,खराळवाडी ,गांधीनगर इ.भागात पाणीपुरवठा व देखभाल दुरुस्ती करणे . | 08-02-2021 | पापु /८/कावि/१०१०/२०२१ | 30-03-2021 | 24,97,318 | 24,97,318 | 527 | 0 | 36.09 | % कमी | 15,96,563 |
| ७ | मे.फ्रेण्ड्स वाटर सप्लायर्स | 7/25/2020-21 | इ प्रभागात ठिकठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करणे .(२०२०-२१) | 08-02-2021 | पापु /८/कावि/९९६/२०२१ | 30-03-2021 | 20,83,596 | 20,83,596 | 0 | 0 | 9.99 | % कमी | 18,75,445 |
| ८ | मे.सागर कन्स्ट्रक्शन | 7/22/2020-21 | प्रभाग क्र.६ मध्ये पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे .(सन २०२०-२१) | 08-02-2021 | पापु /८/कावि/१००४/२०२१ | 30-03-2021 | 16,65,822 | 16,65,822 | 866 | 0 | 35.37 | % कमी | 10,77,487 |
| ९ | मे.के.के.इंटरप्राय्जेस | 7/16/2020-21 | प्रभाग क्र.२ मोशी येथील भागांमध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करणे .(सन २०२०-२१) | 08-02-2021 | पापु /८/कावि/९९८/२०२१ | 30-03-2021 | 18,74,597 | 18,74,597 | 630 | 0 | 36.36 | % कमी | 11,93,624 |
| १० | मे.के.के.इंटरप्राय्जेस | 7/15/2020-21 | क प्रभागातील देहुरस्ता,नागेश्वर नगर ,गायकवाड वस्ती बोऱ्हाडे वाडी ,विनायक नगर ,खिरीड वस्ती व इतर परिसरामध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करणे . | 08-03-2021 | पापु /८/कावि/१०००/२०२१ | 30-03-2021 | 20,82,583 | 20,82,583 | 1,575 | 0 | 36.36 | % कमी | 13,26,931 |
| | एकुण र.रु. | | | | | | २,०१,९८,०४८ | २,०१,९८,०४८ | ७,६६७ | ० | | | १,४१,०९,४१९ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८